**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२</u>** **<u>सं.फौ.ख.क्र.११७९/२०१५</u>**

**सरकार विरूध्द श्रीचंद्र**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – ६**

**माझे नाव – बन्सीधर लक्ष्मण वैदय**
**वय – अंदाजे ४२ वर्ष, व्यवसाय – चालक**
**राहणार – कांद्री, कन्हान.**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब साक्षीदार स्वत:**

दि.१२.१०.२०१३ रोजी काय झाले होते मला माहिती नाही. पोलिसांनी माझे बयान घेतले होते का मला आठवत नाही. मी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली नाही. आता मला फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला आठवत नाही. फिर्यादीस सहीपूरती **<u>निशाणी ७</u>** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. भिमटे यांचा पुकारा केला असता गैरहजर. सबब आरोपीतर्फे उलटतपास नाही.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.12.16 17:39:30 +0530

कामठी
दिनांक १६/१२/२०२५

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.३</u>**

**<u>सं.फौ.ख.क्र.११७९/२०१५</u>**
**सरकार विरूध्द श्रीचंद्र**
**निशाणी – ८**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**माझे नाव – मुकेश श्रिनिवास यादव**
**वय – अंदाजे ४४ वर्ष, व्यवसाय – चालक**
**राहणार – कांद्री, कन्हान.**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. पंचारीया यांच्यातर्फे सुरू**

दि.१२.१०.२०१३ रोजी कांद्री ते कन्हान रोडवरून मी मित्रांसाबत रात्री ०७.३० वाजताच्या दरम्यान मोटारसायकलने जात होतो. त्या रस्त्यावर जुन्या एम.एस.ई.बी. कार्यालयासमोर गर्दी असल्याने आम्ही थांबलो. तेथे ट्रक व मोटार सायकलचा अपघात झाला होता. ट्रकमधील ड्रायव्हर पळून गेला होता व एक ईसम खाली पडला होता. त्याला डोक्याला व पायाला लागल्याचे दिसत होते. रस्त्यावर रक्त पडल्याचे दिसत होते. तेथे लोकांनी अपघातातील ट्रक वेगात होता असे सांगितले. अपघातातील ट्रकने वेगात मोटारसायकल ला धडक दिल्याने मोटारसायकल स्वार पडला होता. लोकांनी कोणत्या तरी वाहनाने त्या व्यक्तीला दवाखान्यात पाठविले होते. पोलिसांनी माझा बयान नोदंविला होता.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. भिमटे यांच्यातर्फे सुरू**

हे म्हणणे खरे आहे की मी प्रत्यक्षात अपघात पाहिलेला नाही.

**उलटतपास संपला.**
**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.12.16 17:39:35 +0530

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी

कामठी
दिनांक १६/१२/२०२५